मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल
www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » बुधवार, दि. 30 एप्रिल 2025 | पान- 1

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

# सुरक्षित आणि ट्रॅफिक मुक्त रस्त्यांसाठी 'हरित सेतू'

## लोकाभिमुख प्रशासन, ग्राहकसेवा आणि मानव संसाधन व्यवस्थापनात उल्लेखनीय कामगिरी

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहराचा शाश्वत आणि सर्वसामावेशक विकास करण्यासाठी सुरक्षित आणि ट्रॅफिक मुक्त रस्त्यांची संकल्पना प्रत्यक्षात राबविण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेने पुढाकार घेतला असून, या अंतर्गत हरित सेतू या पायलट प्रकल्पाची निगडी येथे सुरुवात करण्यात आली आहे. या उपक्रमामध्ये सायकलिंग, पायी चालण्यावर भर दिला जाईल. शहरातील प्रमुख बाजारपेठा, गर्दीची ठिकाणी आणि शाळा जवळ अर्ज सेतू प्रकल्प राबविण्यात येईल.

महापालिकेच्या नव्याने स्थापन केलेल्या शहरी दळणवळण विभागाच्या माध्यमातून हरित सेतू उपक्रम राबविला जाणार आहे. हरीत सेतु उपक्रम भविष्यात भक्ति शक्ती मेट्रो स्टेशनसाठी व आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ करण्यात येणार आहे.



ग्लोबल डिझाइनिंग सिटीज इनिशिएटिव्ह (GDCI) कडून तज्ञ प्रतिनिधी मंडळाने या भागास भेट दिली. यामध्ये तांत्रिक कार्यशाळा, डिझाईन वर्कशॉप आणि प्रत्यक्ष सहभागाच्या कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. या सहकार्यात्मक दृष्टिकोनातून लोकाभिमुख रस्त्यांचे डिझाईन करणेसाठी नवनवीन कल्पना आणि तज्ञ मार्गदर्शन महापालिकेस लाभले. या प्रकल्पाच्या डिझाईनचे नेतृत्व प्रसन्न देसाई आर्किटेक्ट्स (PDA) यांनी केले असून, आशिक जैन यांचे सहकार्य त्यामध्ये त्यांना लाभले आहे. ITDP इंडिया कडून शाश्वत वाहतूक नियोजन तज्ञ मार्गदर्शन मिळाले असून संस्कृती मेनन (CEE) यांनी स्थानिक समुदायाशी संवाद साधण्यास पाठिंबा दिला आहे.

### असा असेल हरित सेतू

सध्या प्रायोगिक तत्वावर सुमारे १०० मीटर लांबीचा रस्ता विकसित करण्यात आला आहे. यामध्ये पायी चालणे, सायकलिंग आणि पावसाचे पाणी व्यवस्थापन यासंबंधी असलेल्या नव्या शहरी धोरणांचा समावेश आहे. त्यामध्ये वृक्षसंवर्धनावर भर देऊन स्थानिक नागरिकांशी संवाद साधून सुसंगतता साधण्यावर भर दिला जात आहे. रंगीबेरंगी भित्तीचित्रे, सार्वजनिक जागांचा विकास आणि विचारपूर्वक केलेली रस्त्यांची रचना यामुळे नागरिकांनी आता या सकारात्मक बदलांचे स्वागत केले आहे.

### पंधरा मिनिटे शहरासाठी

» हरित सेतू हा उपक्रम मुख्यत्वे शहराच्या रहदारीच्या रस्त्यांवरील गर्दी कमी करून हे रस्ते नागरिकांना सुरक्षित व्हावेत असा आहे. यासाठी निवडण्यात आलेल्या रस्त्यांवर सायकल किंवा पायी चालता येणार आहे. कालांतराने याचा शहरभर विस्तार करण्यात येणार आहे.सध्या शाळा बाजारपेठ आणि वाहतूक केंद्रे हरित सेतूच्या माध्यमातून ट्राफिक मुक्त आणि सुरक्षित करण्यात येणार आहे.

“ पिंपरी चिंचवड महापालिका शाश्वत शहरी वाहतूक आणि सर्वसमावेशक शहरी विकासाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलत आहे. हरीत सेतु उपक्रमाच्या माध्यमातून शहरात सुरक्षित, निरोगी, आणि सर्व वयाच्या आणि क्षमतेच्या नागरिकांसाठी समावेशक रस्त्यांची निर्मिती करण्यात येत आहे.

**- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक.**

---

# पिंपरीतील 184 सोसायट्यांमधील ‘एसटीपी’ बंदच

## ‘एसटीपी’ सुरु न करणाऱ्या सोसायट्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील शंभरहून अधिक सदनिका असलेल्या गृहनिर्माण सोसायट्यांना सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित करण्याबाबत महापालिकेने तीनवेळा नोटिसा बजावूनही १८४ सोसायट्यांमधील ‘एसटीपी’ बंदच असल्याचे समोर आले आहे. विविध कारणे पुढे करून ‘एसटीपी’ सुरू ठेवण्यास नकार दिला जात आहे. ‘एसटीपी’ सुरू न करणाऱ्या सोसायट्यांचा पाणीपुरवठा खंडित करण्याचा इशारा महापालिकेने दिला आहे.

पिंपरी-चिंचवड शहर चारही बाजूने विस्तारत असून लोकसंख्याही झपाट्याने वाढत आहे. त्यामुळे पाण्याची मागणीही वाढू लागली आहे. सध्यःस्थितीत शहरवासीयांना ६२० ते ६३० दशलक्ष लीटर (एमएलडी) पाणी एका दिवसाला दिले जात आहे. मात्र, त्यानंतरही शहरातील अनेक मोठ्या सोसायट्यांना टँकरच्या पाण्याचा आधार घ्यावा लागत आहे. त्यामुळे काही सोसायट्यांचा पाण्याचा दरमहा खर्च सव्वा लाख ते दीड लाख रुपयांवर



गेला आहे. एकत्रित बांधकाम आणि विकास नियमावलीनुसार (यूडीसीपीआर) वीस हजार चौरस मीटरपुढील क्षेत्रफळावरील, शंभर सदनिका आणि दररोज वीस हजार लिटर पाण्याचा वापर करणाऱ्या गृहनिर्माण सोसाट्यांना पाण्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रिकरण करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शहरात ४५६ मोठ्या गृहनिर्माण सोसायट्या आहेत. त्यांपैकी २६४ सोसायट्यांमधील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) कार्यान्वित आहेत. तर, ‘एसटीपी’ सुरू करण्याचे वारंवार आवाहन करूनही १८४ सोसायट्यांमधील ‘एसटीपी’ विविध कारणांनी बंदच आहेत.

### पाणीपुरवठा खंडित करणार

» ‘एसटीपी’ बंद असलेल्या ८४ सोसायट्यांना पहिली, ५० सोसायट्यांना दुसरी आणि ५० सोसायट्यांना तिसरी नोटीस महापालिकेने बजाविली आहे. त्यानंतरही या सोसायट्यांनी खर्चासह विविध कारणे देत ‘एसटीपी’ बंद ठेवले आहेत. तर, आठ सोसायट्यांनी महापालिकेच्या पथकास सोसायटीमध्ये प्रवेश दिला नसल्याचे समोर आले आहे. या सोसायट्यांमधील पिण्याचा पाणीपुरवठा खंडित करण्यात येणार असल्याचे महापालिकेने सांगितले आहे.

# पुणे विमानतळाच्या 'कनेटिव्हिटी'ला गती

## खडकवासला-खराडी मेट्रो मार्गिकेसह चार मार्गिका विमानतळाला जोडण्याचे विचाराधीन




**पुणे | प्रतिनिधी**

शहराच्या कोणत्याही भागातून पुणे विमानतळावर येणे सुलभ व्हावे या दृष्टीने विमानतळाची 'कनेक्टिव्हिटी' वाढविण्यात येणार आहे. त्यानुसार खडकवासला ते खराडी ही मेट्रो मार्गिका विमानतळाला जोडण्याचे विचाराधीन आहे. त्याबाबतचे नियोजन सुरू झाले असून, मेट्रो मार्गिकांचा विस्तार करण्यासाठी सविस्तर प्रकल्प आराखडा (डिटेल प्रोजेक्ट रिपोर्ट- डीपीआर) करण्यासाठी महापालिकांनी निधी द्यावा आणि महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनने डीपीआर करावा, अशी सूचना करण्यात आली आहे.

केंद्रीय नागरी हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या अध्यक्षतेखाली विमानतळ सल्लागार समितीची (एएसी) बैठक झाली. तीन वर्षांनंतर होत असलेल्या या बैठकीत विमानतळाशी संबंधित अनेक विषयांवर चर्चा करण्यात आली. या बैठकीनंतर मोहोळ यांनी त्याबाबतची माहिती दिली. पुणे विमानतळाचे संचालक संतोष ढोके, वडगावशेरीचे आमदार बापूसाहेब पठारे यांच्यासह व्यापार, उद्योग, पर्यटन आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्ती यावेळी उपस्थित होते.

पुण्यातील सध्याच्या चार मेट्रो मार्गिका थेट पुणे विमानतळाशी जोडण्यात येणार आहेत. खडकवासला ते खराडी ही मेट्रो मार्गिकाही विमानतळाला जोडण्यात येणार आहे. त्यासंदर्भात मेट्रोच्या व्यवस्थापकीय संचालकांबरोबर चर्चा झाली असून, भारतीय विमानतळ प्राधिकरण आणि केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयातील अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करण्यात आली आहे. मेट्रो मार्गिका महापालिकांच्या अखत्यारित येत असल्याने त्यांनी विमानतळापर्यंतच्या विस्तारित मार्गिकाचा डीपीआरसाठी निधी द्यावा आणि महामेट्रोने डीपीआर करावा, अशी सूचना अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे, असे मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

> कोटपुण्यातून दररोज २०० विमानांची ये-जा होत असून ५२ हजार चौरस मीटर क्षेत्रावर नवीन टर्मिनल सुरू करण्यात आले आहे. जुन्या टर्मिनलचाही पुनर्विकास करण्यात येणार असून, नव्याने काही ठिकाणी विमानसेवा सुरू करण्यात आली आहे. धावपट्टी विस्तारासाठी सातत्याने बैठका सुरू आहेत.
>
> **- मुरलीधर मोहोळ, केंद्रीय विमान वाहतूक राज्यमंत्री.**

येत्या ५० ते १०० वर्षांचा विचार करून पुणे विमानतळाचा विस्तार करण्यात येणार आहे. त्यासाठी २०० एकर जागेची आवश्यकता असून, त्यातील २५ एकर जागा संरक्षण विभागाकडून घेण्यात येणार आहे. त्याबदल्यात संरक्षण विभागाला दुसरीकडे जागा दिली जाणार आहे. तर, ६५ एकर खासगी जागेचेही हस्तांतरण करण्यात येणार असून उर्वरित जागेसाठीही चर्चा सुरू झाल्याची माहिती मुरलीधर मोहोळ यांनी दिली. विमानतळ धावपट्टीच्या विस्तारासाठी 'ओएलएस' सर्वे झाला असून, सर्व विभागांसमवेत बैठका सुरू आहेत. भूसंपादनाचे काम राज्य सरकारकडून करण्यात येणार आहे. विमानतळालगतच्या रस्त्याला पर्यायी रस्ता करावा लागणार असून, पुणे महापालिका त्यासाठी ६५ कोटींचा खर्च करणार आहे. कार्गोसाठीही स्वतंत्र व्यवस्था केली जाईल, असेही मुरलीधर मोहोळ यांनी सांगितले.

# वाहतूककोंडीतून मुक्तता होणार!

## सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलास मुहूर्त : महाराष्ट्रदिनी अजित पवारांच्या हस्ते उद्घाटन



**पुणे | प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील (नरवीर तानाजी मालुसरे रस्ता) विठ्ठलवाडी ते फन टाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपूल खुला करण्यास अखेर मुहूर्त मिळाला आहे. या एकेरी उड्डाणपुलाचे उद्घाटन महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून १ मे रोजी सकाळी सात वाजता उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. यामुळे राजाराम पुलाकडून वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची महाराष्ट्रदिनी वाहतूककोंडीतून मुक्तता होणार आहे.

सिंहगड रस्त्यावरील वाहतूककोंडीची समस्या सोडविण्यासाठी महापालिकेने राजाराम पूल चौक ते फन टाइम थिएटर यादरम्यान अडीच किलोमीटर लांबीच्या उड्डाणपुलाचे काम हाती घेतले आहे. या उड्डाणपुलाचे काम २१ सप्टेंबर २०२१ मध्ये सुरू करण्यात आले असून ७१ पिलर्स आणि १०६ गर्डर उभारलेले आहेत.

विठ्ठलवाडीकडून स्वारगेटकडे येण्यासाठी राजाराम पूल चौकात उभारलेला उड्डाणपूल यापूर्वीच वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यान एकेरी उड्डाणपुलाचे काम पूर्ण झाले आहे, तर माणिकबाग ते विठ्ठलवाडी यादरम्यानच्या एकेरी पुलाच्या दोन्ही बाजूंच्या रॅम्पचे काम सुरू आहे.

विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपूल मार्चअखेर, माणिकबाग ते विठ्ठलवाडी यादरम्यानचा उड्डाणपूल डिसेंबरअखेर वाहतुकीसाठी खुला करण्याचे प्रशासनाने जाहीर केले आहे. विठ्ठलवाडी ते फनटाइम थिएटर यादरम्यानचा उड्डाणपुलाचे काम पूर्ण होऊनही केवळ उद्घाटनासाठी केवळ नेत्यांची वेळ मिळत नसल्याने तो वाहतुकीसाठी खुला केला जात नव्हता. उड्डाणपुलाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व्हावे, यासाठी भाजपची नेतेमंडळी प्रयत्नशील होती. उद्घाटनाचा मुहूर्त ठरल्याचेही भाजपकडून सांगण्यात येत होते. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते रविवारी, दि. २७ एप्रिल रोजी उड्डाणपुलाचे उद्घाटन होणार असल्याचे सांगितले जात होते. त्यातच दोन दिवस मुख्यमंत्री शहरात होते. त्यामुळे उड्डाणपुलाचे उद्घाटन होईल, अशी आशा होती. मात्र, उद्घाटन झाले नाही. त्यामुळे समाजमाध्यमातून मोठ्या प्रमाणात नाराजी व्यक्त झाली.

त्यानंतर तातडीने सूत्रे हलली आणि उड्डाणपुलाच्या उद्घाटनाचा मुहूर्त अखेर १ मे रोजी सकाळी ७ वाजता उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते करण्याचे ठरले. त्यामुळे महाराष्ट्रदिनी राजाराम पूल चौकातून वडगावच्या दिशेने जाणाऱ्या वाहनचालकांची कोंडीतून सुटका होणार आहे.

# उद्यानांमध्ये आता कॅशलेस प्रवेश

## पिंपरी-चिंचवड महापालिकेमध्ये पहिल्यांदाच प्रयोग : 'पॉइंट-ऑफ-सेल'ची व्यवस्था

**पिंपरी | प्रतिनिधी**

कॅशलेस व्यवहारांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि पारदर्शकता वाढवण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या उद्यान विभागाने शहरातील १० लोकप्रिय उद्यान आणि इतर सुविधांमध्ये एकूण १३ पॉइंट-ऑफ-सेल म्हणजेच पीओएस मशिन्सची व्यवस्था केली आहे.

पीसीएमसीच्या उद्यानांमध्ये पहिल्यांदाच पीओएस मशिन्स बसवण्यात आल्या आहेत. यापूर्वी प्रवेश शुल्कासाठी फक्त रोख व्यवहार स्वीकारले जात होते. आता या नव्या प्रणालीमुळे नागरिक पीओएस मशिनद्वारे प्रवेश शुल्क भरणार असून, प्रत्येक व्यवहारासाठी एक प्रत्येक व्यवहारासाठी एक नवीन डायनॅमिक क्यूआर कोड तयार होईल. त्यामुळे प्रत्येक पेमेंटची नोंद राहील आणि व्यवहार पारदर्शक होतील.



या उपक्रमाविषयी बोलताना आयुक्त शेखर सिंह म्हणाले, "उद्यानांमध्ये पीओएस मशिन्सचा वापर सुरू केल्यामुळे आम्ही अधिक पारदर्शक आणि जबाबदार प्रणाली निर्माण करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. प्रत्येक व्यवहाराचा डिजिटल ठसा राहिल्याने नागरिकांचा विश्वास वाढेल आणि त्यांना अधिक सोय होईल."

उद्यान विभागाचे सहायक आयुक्त उमेश ढाकणे म्हणाले, "पीओएस आधारित कॅशलेस प्रणालीमुळे कामकाजात सुसूत्रता येईल आणि उद्यानांच्या प्रवेश व्यवहारांचे अधिक प्रभावीपणे निरीक्षण आणि लेखापरीक्षण करता येईल. ही आपल्या सुविधांच्या आधुनिकीकरणाच्या दिशेने एक मोठी झेप आहे."

### या उद्यानात पीओएस मशीन

» पीओएस मशिन्स भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी उद्यान (२ मशिन्स), राजमाता जिजाऊ उद्यान (डायनासोर गार्डन) (२ मशिन्स), दुर्गादेवी उद्यान (१ मशिन), वीर सावरकर उद्यान (१ मशिन), बर्ड व्हॅली उद्यान (१ मशिन), ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले उद्यान (१ मशिन), भोसरी सहल केंद्र (१ मशिन), थेरगाव बोट क्लब (१ मशिन), गुलाब पुष्प उद्यान (ऑफिस - १, नेहरूनगर - १), सेंट्रल नर्सरी (१ मशिन) याठिकाणी बसवण्यात आल्या आहेत.

# "पीसीएमसी @50" उपक्रमांतर्गत 20 हजार नागरिकांचे सर्वेक्षण

## महापालिकेच्या वतीने शहराच्या भविष्यातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी 'पीसीएमसी@50'

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला २०३२ साली ५० वर्ष पूर्ण होणार आहेत. यासाठी महापालिकेच्या वतीने शहराच्या भविष्यातील सर्वसमावेशक आणि शाश्वत विकासासाठी "पीसीएमसी@५०" शहर नियोजन धोरण राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शहरातील विविध घटकातील 20 हजार नागरिकांचा सर्वेक्षण उपक्रम राबविणार आहे. या सर्वेक्षणामध्ये शहरातील विविध स्वयं सहायता गटातील 250 हून अधिक महिला सर्वेक्षण करणार आहेत. या सर्वेक्षणासाठी नागरिकांनी महिला बचत गटांच्या महिलांना सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

पीसीएमसी@५०" शहर नियोजन उपक्रमाअंतर्गत शहरातील सर्व स्तरातील नागरिकांचे प्रातिनिधिक स्वरुपात प्रतिनिधित्व सुनिश्चित करत सर्वेक्षण केले जाणार आहे. या सर्वेक्षणामध्ये महिला बचत गटांमार्फत शहरातील फेरीवाले, भाजीपाला विक्रेते, रिक्षाचालक, नोकरदार वर्ग, झोपडपट्ट्यांतील कुटुंबे, गृहसंकुलातील रहिवासी, सामाजिक संस्था, व्यावसायिक आस्थापना आणि शैक्षणिक संस्थाचे देखील सर्वेक्षण केले जाणार आहे. मे २०२५ च्या पहिल्या आठवड्यापासून सुरू होणारे हे सर्वेक्षण तीन आठवड्यांत पूर्ण होणार आहे.



येत्या काही दिवसांमध्ये महापालिका हद्दीतील विविध प्रभागांमध्ये हा सर्वेक्षण उपक्रम सुरू होणार आहे. यासाठी जानेवारी ते मार्च 2025 दरम्यान सुमारे 1500 हितधारकांच्या सहभागासह, फोकस गट चर्चा यशस्वीपणे पार पडल्या आहेत. त्यातून महत्त्वपूर्ण सूचनांची नोंद या उपक्रमांमध्ये घेण्यात आली आहे. "पीसीएमसी@५०" या शहर नियोजन उपक्रमाअंतर्गत शहरी वाहतूक, पर्यावरण, तंत्रज्ञान, प्रशासन, पायाभूत सुविधा आणि आर्थिक विकास अशा महत्त्वपूर्ण क्षेत्रांवर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. यासाठी आयोजित फोकस गट चर्चा आणि नागरिक सर्वेक्षणातून मिळणारी माहितीच्या आधारावर महापालिकेच्या भावी योजनांचा पाया ठरणार आहे.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला २०३२ सालापर्यंत ५० वर्ष पूर्ण होणार आहेत. यासाठी महानगरपालिकेच्या वतीने शहरात "पीसीएमसी@५०" शहर नियोजन धोरण राबविण्यात येत आहे. यासाठी पिंपरी येथील आचार्य अत्रे रंगमंदिर येथे टाटा स्ट्राईव्ह व महापालिकेच्या सिटी ट्रान्सफॉर्मेशन ऑफिस यांच्या संयुक्त विद्यमाने सर्वेक्षण करणाऱ्या बचत गटांच्या महिलांना सर्वेक्षकांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे.
>
> **- अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त.**

> शाश्वत आणि समृद्ध पिंपरी-चिंचवड घडवण्यासाठी शहरातील नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे. यासाठी नागरिकांनो तुमच्या अपेक्षा व सूचना मनमोकळेपणाने मांडा, जेणेकरून भविष्यातील सक्षम पिंपरी चिंचवड शहररचना आपल्या सामूहिक दृष्टिकोनाचे प्रतिबिंब ठरेल.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक.**

# जिल्ह्यातील पर्यटकांची संख्या 5 वर्षात 1 कोटींवर

## 50 हजार थेट तर, पाच लाख अप्रत्यक्ष रोजगारनिर्मितीचे ध्येय : उपमुख्यमंत्री पवार

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यातील मुळशी येथे जागतिक पॅराग्लायडींग स्पर्धेचे आयोजन, जिल्ह्याच्या सर्व तालुक्यांमधून जाणारी ग्रॅन्डसायकलिंग चॅलेंज स्पर्धा, बारामती व इंदापूरला हॉटएअर बलून फेस्टीव्हल, पवना धरणक्षेत्रात जलक्रीडा पर्यटनाच्या सुविधा, ऐतिहासिक गडकिल्ले, प्राचीन मंदिरे, निसर्गरम्य घाटांचा पर्यटनाच्यादृष्टीने विकास, जिल्ह्यातील कलावंताचा सहभागातून गायन, वादन, नाटक, साहित्य,काव्य,कथावाचनासारख्या सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन, पर्यटकांना पर्यटनस्थळे पाहण्याचा आनंद देण्याबरोबरच साहसी खेळांचा प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या 'मोटरबोटींग', 'झिपलाईन'सारख्या साहसी खेळ सुविधांची निर्मिती अशा अनेक उपक्रमांचा समावेश असलेल्या, शाश्वत अशा पुणे जिल्हा पर्यटन विकास आराखड्याचे सादरीकरण उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मंत्रालयात झालेल्या बैठकीत करण्यात आले.

पुणे जिल्ह्यातील गडकिल्ले, प्राचीन मंदिरे, लोककला, लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा, पर्यटनवाढीची अमर्याद संधीचा उपयोग करुन पुणे जिल्ह्याचे देशाच्या पर्यटन नकाशावर स्वतंत्र स्थान निर्माण करण्याचा निर्धार उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला असून त्याअनुषंगाने जिल्ह्याचा सर्वसमावेशक पर्यटन विकास आराखडा तयार करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्याचा प्राथमिक मसूदा तयार करण्यात आला असून त्याचे सादरीकरण उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखालील विशेष बैठकीत आज मंत्रालयात करण्यात आले. बैठकीला उपमुख्यमंत्र्याचे सचिव डॉ. राजेश देशमुख, पुण्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदींसह मंत्रालय आणि पुणे जिल्ह्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत मार्गदर्शन करताना उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, आपल्या राज्यात येणाऱ्या विदेशी पर्यटकांपैकी 79 टक्के पर्यटक मुंबईला भेट देतात तर अवघे 14 टक्के पर्यटक पुण्याला येतात. पुणे जिल्हा पर्यटन विकास आराखड्याच्या यशस्वी आणि सातत्यपूर्ण अंमलबजावणीतून येत्या तीन वर्षात जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांची संख्या चाळीस लाखांवर तर पुढील पाच वर्षात एक कोटींवर नेण्याचा आमचा प्रयत्न आहे. त्यातून जिल्ह्याच्या जीडीपीत दहा ते पंधरा हजार कोटींची वाढ होईल. पन्नास हजार थेट रोजगार तर पाच लाख अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होतील अशी अपेक्षा आहे. जिल्ह्याच्या पर्यटनवाढीसाठी हाती घेतलेले सर्व उपक्रम हे कायम सुरु राहतील. पॅराग्लायडींग स्पर्धा, ग्रॅन्डसायकलिंग चॅलेंज स्पर्धा, हॉटएअर बलून फेस्टीव्हल, सांस्कृतिक महोत्सवांचे आयोजन दरवर्षी विशिष्ट कालावधीत नियमितपणे केले जाईल. त्यातून जिल्ह्याच्या पर्यटनक्षेत्राला नवी ओळख मिळेल, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत व्यक्त केला.



उपमुख्यमंत्री अजित पवार पुढे म्हणाले की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही यंदाच्या अर्थसंकल्पात पर्यटनवाढीला महत्त्व आणि भरीव निधी दिला असून हा मुद्दा त्यांच्या सर्वोच्च प्राधान्य यादीत आहे. पर्यटन विकासासाठी राज्यांना संपूर्ण सहकार्य करण्याचे धोरण केंद्र सरकारने स्वीकारले आहे. याचा फायदा महाराष्ट्राला करुन घेत असताना पुणे जिल्ह्यानंही पर्यटनविकासात आघाडीवर असलं पाहिजे. त्यासाठी जिल्ह्याचा पर्यटन विकास आराखडा महत्त्वाचा आहे. यातून जागतिक पर्यटनाच्या नकाशावर पुणे जिल्ह्याचं स्वतंत्र स्थान निर्माण होईल. त्यसाठी जिल्ह्याच्या स्वतंत्र पर्यटन लोगो, स्वतंत्र घोषवाक्य असेल. यातून स्वतंत्र ब्रॅन्ड निर्माण होईल शिवाय जागतिक ओळख आणि लोकप्रिय व्यक्तिमत्वं असलेला 'ब्रॅन्ड ॲम्बॅसॅडर' नियुक्त करण्याचा प्रयत्न करु, असेही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्पष्ट केले.

पुणे जिल्हाचा पर्यटन विकास आराखडा तयार करताना अन्य राज्यांचाही अभ्यास करण्यात आला आहे. गुजरात राज्याने कच्छच्या वाळवंटात 'रणउत्सव', अरुणाचल प्रदेशने झिरो व्हॅलिमध्ये 'झिरो फेस्टीव्हल', राजस्थानमध्ये जयपूरला 'साहित्य महोत्सव', नागालॅन्डमध्ये 'हॉर्नबिल महोत्सव'सारखे सुरु केलेले उपक्रम अपेक्षेपेक्षा यशस्वी ठरले. त्यातून त्या राज्यांच्या पर्यटनाला स्वतंत्र ओळख मिळाली. आर्थिक उलाढाल वाढली. महसूल वाढला. प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगारनिर्मिती झाली. पर्यटनस्थळांच्या मार्गावरील गावांचा, शहरांचा विकास होण्यासही मदत झाली. पुणे जिल्ह्याच्या पर्यटन विकास आराखड्यातूनही आपलीही उद्दीष्टे पूर्ण होतील. त्यासाठी जिल्ह्यातील पर्यटनाशी संबंधित नामांकित, तज्ञ व्यक्ती, संस्था, संघटनांचे सहकार्य घ्यावे. पुणे जिल्ह्याचा पर्यटनविकास आराखडा राबवताना तो सर्वांच्या सहकार्याने, मदतीने राबवावा. शक्य तिथे खासगी संस्था, संघटनांची मदत घ्यावी. राज्य शासनाकडून यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करण्यात येईल. निधीची कमी भासू दिली जाणार नाही, असा विश्वासही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बैठकीत दिला.

### श्रीक्षेत्र भीमाशंकर आणि सिंहगड किल्ला परिसर विकास आढावा

» श्रीक्षेत्र भीमाशंकर विकास आराखडा आणि सिंहगड किल्ला समर्ग संवर्धन विकास आराखड्याचाही बैठकीत आढावा घेण्यात आला. श्रीक्षेत्र भीमाशंकर आणि सिंहगड किल्ल्याचे आध्यात्मिक, ऐतिहासिक महत्व लक्षात घेऊन नवीन विकासकामे करण्यात यावी. हे करताना मंदिर आणि किल्ला परिसराचे ऐतिहासिक, प्राचीन सौंदर्य कायम राहील, याची पूर्ण काळजी घ्यावी, अशा सूचनाही उपमुख्यमंत्री अजित पवारा यांनी दिल्या.

# पुणे विमानतळावर 'उड्डाण यात्री कॅफे' सुरू

## वडापाव 20 रुपये, पाणी बॉटल 10 रुपये आणि चहा 10 रुपयाला मिळणार

**पुणे | प्रतिनिधी**

विमान प्रवाशांना विमानतळावर पिण्याच्या पाणी, चहा, कॉफी, वडापाव स्वस्तात मिळावा, यासाठी उड्डाण योजनेअंतर्गत नव्या टर्मिनलवर उड्डाण यात्री कॅफे सुरू करण्यात आला आहे. या कॅफेचे उद्घाटन केंद्रीय नागरी हवाइ राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी केले. या कॅफेत वडापाव २० रुपये, पाणी बॉटल १० रुपये आणि चहा १० रुपयाला मिळणार आहे. हा कॅफे २४ तास खुला असणार आहे. त्यामुळे प्रवाशांना कमी दरात पदार्थांची चव चाखता येणार आहे.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेनुसार देशात अनेक विमानतळावर उड्डाण यात्री कॅफे सुरू करण्यात येत आहे. सध्या देशात कलकत्ता, चैन्नइ, अहमदाबाद आणि आता पुण्यात उड्डाण यात्री कॅफे सुरू झाली आहे. त्यामुळे लोहगाव येथील आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांना आता स्वस्तामध्ये चहा-कॉफी उपलब्ध झाली आहे. यामुळे सर्वसामान्य प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, कमी दरात चहा, कॉफी, पाणी बाटली, वडापाव समोसा याची चव चाखता येणार आहे. विमानतळावर प्रवास करणाऱ्या सामान्य व्यक्तीला तेथील चहा, कॉफीचे दर परवडत नाहीत. त्यामुळे विमान वाहतूक मंत्रालयाने प्रवाशांना विमानतळावर स्वस्त दरामध्ये खाद्यपदार्थ मिळावेत म्हणून उडाण यात्री कॅफे योजना सुरू केली. त्यानुसार कोलकता येथील नेताजी सुभाषचंद्र बोस विमानतळावर पहिले उडान कॅफे सुरू करण्यात आले होते. आता पुण्यात ही योजना सुरू केल्यामुळे विमान प्रवाशांना दिलासा मिळाला आहे.

### मुंबई विमानतळावर लवकरच उड्डाण यात्री कॅफे

» पुण्यानंतर मुंबई विमानतळावर लवकरच उड्डाण कॅफे सुरू करण्यात येणार आहे. तसेच केंद्र सरकारकडून विमान प्रवास वाढावा, यासाठी नागरिकांना प्रोत्साहन केले जात आहे. त्यासाठी नवीन विमानतळे सुरू केली जात आहेत. तर, जुन्या विमानतळाचा विकास करून त्याठिकाणी आधुनिक सुविधा दिल्या जात आहे. तसेच देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमानांची संख्यादेखील वाढविण्यात येत आहे, असेही मुरलीधर मोहोळ यांनी म्हणाले.